# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

विभागीय कार्यालय,कोटला रोड,सर्जेपूरा,अहमदनगर-४१४००१.

दूरध्वनी क्र.०२४१-२४१६६०६ ई-मेल :dpostang@gmail.com

परिपत्रक

जाक्र/राप/विनिअह/आस्था-३/ ८८५३ दिनांक : १८.१२.२०२२

विषयः कार्यशाळेतील निर्देशित व्यवसायामध्ये फेब्रुवारी २०२३-२४ सत्रासाठी शिकाऊ उमेदवारांच्या भरतीबाबत.

शिकाऊ उमदेवार कायदा सन १९६१, १९७३ अन्वये रा.प.अहमदनगर विभागामध्ये विभागीय कार्यशाळा क्र.१ रा.प.अहमदनगर व विभागीय कार्यशाळा क्र.२ रा.प.श्रीरामपूर फेब्रुवारी २०२३-२४ या सत्रासाठी कार्यशाळेच्या खाली निर्देशित केलेल्या निरनिराळया व्यवसायामध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यात यावयाची आहे.

रा.प. अहमदनगर विभागात काम करणा-या तसेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या एक मुलास तो सदर पदाच्या खाली नमुद केलेल्या अटी पूर्ण करीत असल्यास शिकाऊ उमेदवारीसाठी दिनांक **०५.०१.२०२३** पर्यंत अर्ज करता येईल. परंतु अशा मुलांची नोंदणी सेवायोजन कार्यालयाकडे करणे आवश्यक असून नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमुद करुन अर्जासोबत सेवायोजन, समाजकल्याण कार्यालयातील नोंदणी कार्डची छायांकित प्रतही जोडणे आवश्यक आहे.

**विभागीय कार्यशाळा क्र.१ रा.प. अहमदनगर व विभागीय कार्यशाळा क्र.२ रा.प. श्रीरामपुर साठी**

**पदाचे नाव**

***१)मेकॅनिक मोटार व्हेईकल-*** पदांची संख्या २४ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता**- १)दोन वर्षाचा शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय **मोटार मेकॅनिक कोर्स** पुर्ण व पास असणे आवश्यक
विदयावेतन दरमहा वि.का.शा अहमदनगर रु.१००२७.८०/- व वि.का.शा श्रीरामपूर रु. ९८४७.८०/-
२)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा एस.एस.सी उत्तीर्ण अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
३)ऑटो इंजिनिअरींग टेक्निशियन हा विषय घेऊन इ.१२ वी पास झालेल्या उमेदवारांना सदर व्यवसायाच्या शिकाऊ उमेदवारीसाटी अर्ज करता येईल.
(फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत)

***२) ऑटो इलेक्ट्रिशियन-*** पदांची संख्या १० [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता**- १)दोन वर्षाचा शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय **इलेक्ट्रिशियन** कोर्स पुर्ण व पास असणे आवश्यक (फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जा सोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत)
२)विज्ञान( फिजिक्स /केमेस्ट्री) या विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा एस.एस.सी उत्तीर्ण अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
३)विदयावेतन वि.का.शा अहमदनगर रु.१००२७.८०/- व वि.का.शा श्रीरामपूर रु. **९८४७.८०/-**

**३)मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर-** पदांची संख्या १० [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता** १) एक वर्षाचा शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय **शिट मेटल वर्कर** कोर्स पुर्ण व पास

२)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा एस.एस.सी उत्तीर्ण अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. (फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत))

३) विदयावेतन वि.का.शा अहमदनगर रु.**८९१३.६०/-**व वि.का.शा श्रीरामपूर रु. **८७५३.६०/-**

**४) पेन्टर (जनरल)-** पदांची संख्या ०५ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता** १) शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय पेंटर (जनरल) कोर्स पुर्ण व पास असणे आवश्यक (फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत)

२) विदयावेतन वि.का.शा अहमदनगर रु.**१००२७.८०/-** वि.का.शा श्रीरामपूर रु. **९८४७.८०/-**

**५) वेल्डर (गॅस व इले.).** पदांची संख्या ०५ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता-** १) शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय एक वर्षाचा **वेल्डर** कोर्स पुर्ण व पास असणे. (फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत)

२)विदयावेतन विदयावेतन वि.का.शा अहमदनगर रु.**८९१३.६०/-** व वि.का.शा श्रीरामपूर रु. **८७५३.६०/-**

**६ डिझेल मॅकनिक -** पदांची संख्या ०६ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता-**१) एक वर्षाचा शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय **डिझेल मेकॅनिक कोर्स** पुर्ण व पास असणे आवश्यक (फक्त गुणपत्रक बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे. अर्जात गुण नमुद करु नयेत)

२)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा एस.एस.सी उत्तीर्ण अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

३)विदयावेतन विदयावेतन वि.का.शा अहमदनगर रु.**८९१३.६०/-** व वि.का.शा श्रीरामपूर रु. **८७५३.६०/-**

**वयोमर्यादा-** अ.क्र. १ ते ६ या पदासाठी वयामर्यादा दि.**०१.०२.२०२३** रोजी १५ वर्षापेक्षा कमी आणि ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेत ५ वर्षाची सुट राहील.

**७) अ. इंजिनिअरिंग ग्रॅज्यूएटः- (मेकॅनिक / ऑटो इंजिनिअरींग)** पदांची संख्या २ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता-** मान्यताप्राप्त विदयापीटाची अभियांत्रिकी(मेकॅनिक/ऑटोमोबाईल ) इंजिनिअरींग ग्रॅज्युएट असणे आवश्यक (फक्त गुणपत्रक स्वतंत्र बंद पाकीटात अर्जासोबत जोडावे.)

विदयावेतन दरमहा रु.**९०००/-**

**ब .डिप्लोमा होल्डर (मेकॅनिक / ऑटो इंजिनिअरींग)** - [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता-** शासन मान्यताप्राप्त तंत्रनिकेतन विदयालयाचा मेकॅनिकल /ॲटोमोबाईल डिप्लोमा कोर्स उत्तिर्ण असणे आवश्यक. (गुणपत्रक फक्त स्वतंत्र बंद पाकिटात अर्जासोबत जोडावेत. अर्जात गुण नमुद करु नयेत.)

विदयावेतन- **८०००/-** दरमहा.

## ८) विभागीय कार्यालय अहमदनगर करीता

**अकौंटन्सी ॲन्ड ऑडीटीग-** पदांची संख्या २ [कालावधी ०१ वर्ष]

**शैक्षणिक अर्हता-** [कोड नं.एम1,एम2,एम3 असलेला] अकौटन्सी ॲन्ड ऑडीटीग हा विषय घेऊन इ.१२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक (गुणपत्रक फक्त स्वतंत्र बंद पाकिटात अर्जासोबत जोडावेत. अर्जात गुण नमुद करु नयेत.)

विदयावेतन- **७०००/-** दरमहा.

अ.क्र. ६ व ७ साठी तीन वर्षापुर्वी वरील विषयाची परिक्षा पास झालेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारीसाठी विचार केला जाणार नाही. अं.क.७ व ८ या पदासाठी दि. **०१/०२/२०२३** रोजी वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. [ मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये ५ वर्षाची सुट राहील.]

### <u>उमेदवारांना सूचना</u>

१.रा.प.खात्यात काम करणारे अथवा सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या कर्मचा-यांच्या फक्त एका मुलास वरील सर्व अर्हता व अटींची पुर्तता करीत असल्यास अर्ज करता येईल. त्यासाठी त्यांनी सदरच्या अर्जासोबत त्यांचे वडील ज्या आगारात / शाखेत काम करीत आहेत त्या आगार / शाखा प्रमुखांचा तसा दाखला घेऊन तो दाखला अर्जास जोडून सदरचा अर्ज शाखा प्रमुखांमार्फत या कार्यालयास पाठवावा.

२.रा.प.कर्मचा-यांच्या / सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या एका मुला/मुलीसच अर्ज करता येईल व यापुर्वी या योजनेचा त्यांनी लाभ घेतला नसल्याचे लेखी निवेदन संबंधित रा.प.कर्मचा-याने सहीसह देऊन ते देखिल अर्जासोबत जोडावे.

तसेच सेवा निवृत्त कर्मचा-याने सेवा निवृत्तीच्या विभा.आस्थापना आदेशाची प्रत देखील अर्जासोबत जोडावी.

३.अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, आयटीआय गुणपत्रक, एसएसी / एचएससी पासचे गुणपत्रक, प्रमाणपत्र, मागासवर्गीयांसाठी जातीचा दाखला, सेवायोजन कार्यालयाकडील नाव नोंदणी केलेल्या कार्डची प्रत, आधार कार्ड छायांकित प्रत इत्यादी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. तथापि अर्जात गुण कोठेही नमुद करु नयेत.

४.संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रकाची साक्षांकित सत्यप्रत स्वतंत्र बंद पाकीटात जोडावी व त्यावर स्वतःचे नाव, पदाचे नाव, व्यवसायाचे नाव, जात इत्यादी नमुद करावे व ते बंद पाकीट इतर प्रमाणपत्रासोबत अर्जास जोडावे.

[जसे कार्यशाळेकडील वेगवेगळया व्यवसायासाठी आय.टी.आय.पासचे गुणपत्रक/ इंजिनिअरींग / डिप्लोमासाठी संबंधित पासचे गुणपत्रक / अकौंटन्सी ॲन्ड ऑडीटिंग या पदासाठी इयत्ता १२ वी पासचे गुणपत्रक.]

५.उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच अर्ज तयार करणे आवश्यक असून त्यावर अलीकडच्या काळात काढलेला पासपोर्ट आकाराचा स्वतःचा फोटो, स्वतःचे स्वाक्षरीसह अर्जात नमुद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

६.अर्ज www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करुन अर्ज सादर करणे व या कार्यालयात ऑनलाईन भरलेला अर्ज या कार्यालयात सादर केल्यानंतर या कार्यालयाकडून यापुर्वी भरुन घेण्यात येणा-या अर्जाबाबत पुढील सुचना देण्यात येतील.

७.अ. सदरचे ऑनलाईन विहित नमुन्यातील अर्जासोबत उमेदवाराने भरती प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये ५९०/- खुल्या प्रवर्गासाठी व रुपये ३००/- मागासवर्गीयांसाठी "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ फंड अकौंट अहमदनगर" **M.S.R.T.C Corporation Fund Account, payable at Ahmendnagar** या नावाने काढलेल्या व अहमदनगर जिल्हा स्तरावरील बँकेत अधिदानित होणारा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा इंडियन पोस्टल ऑर्डर इत्यादी व्दारे सदरची भरती प्रक्रिया शुल्क भरता येईल. सदरचे डिमांड ड्राफ्ट मागे स्वतःचे पुर्ण नाव, पदाचे नाव, ट्रेडचे नाव, जात इत्यादी ठळक अक्षरात उमेदवाराने लिहिणे आवश्यक आहे व ते अर्जासोबत जोडावे.

तसेच भरती प्रक्रिया शुल्कामध्ये वाढ झाली तर जी रक्कम वाढेल ती उर्वरित रक्कम आपल्याला या कार्यालयाकडे जमा करावी लागेल.

भरती प्रक्रिया शुल्क न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व ते अर्ज बाद करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

८.अपुर्ण अर्ज अथवा अपुर्ण कागदपत्रे, बंद पाकीट नसलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाही.

९.शिकाऊ उमेदवार निवड समितीकडून ज्या विभागीय कार्यशाळेसाठी उमेदवाराची निवड करण्यात येईल त्या विभागीय कार्यशाळेत शिकाऊ उमेदवारी पुर्ण करावी लागेल. शिकाऊ उमेदवारांचा कालावधी हा एक वर्षाचा राहिल.

१०.अ.क्र.१ ते ४ मधील व्यवसायातील उमेदवारांनी एक वर्षाची शिकाऊ उमेदवारी पुर्ण केल्यानंतर उमेदवार रा.प.महामंडळाच्या सेवेमध्ये सामावून घेण्यास पात्र राहणार नाही. तथापि ज्यावेळी सहाय्यक पदात नोकरभरती केली जाईल त्यावेळी त्यांनी रितसर अर्ज केल्यास इतरांबरोबर त्यांच्या अर्जाचा रा.प.चे नियमानुसार विचार करण्यात येईल व ही अट मान्य असेल तरच इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत.

११.यापुर्वी अन्य कोठेही शिकाऊ उमेदवारी केली असल्यास अशा उमदेवारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसे आढळून आल्यास त्यांची शिकाऊ उमेदवारी रद्द करण्यात येवून त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वरील अटी मान्य असल्यासच व सर्व अटींची पुर्तता करीत असल्यासच उमेदवाराने अर्ज भरावा.

१२.या कार्यालयास अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक : ०५.०१.२०२३ पर्यंत असून त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही यादी नोंद घ्यावी.

वरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

सोबत - अर्जाचा नमुना.

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन अहमदनगर

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी सादर रवाना-

१.यंत्र अभियंता[चालन]/उपयंत्रअभि./विभांअ/रा.प.अहमदनगर/श्रीरामपूर.

२.विलेअ/विवाअ/विवाअधि/काअ/विकअ/विसां/वि.अभि.[स्था]/सुवदअ/आस्थापना पर्य.रा.प.अहमदनगर.

३.आगार व्यवस्थापक/आगार लेखाकार रा.प. तारकपूर/संगमनेर/शेवगाव/कोपरगाव/श्रीरामपूर/जामखेड/ पारनेर/श्रीगोंदा/ नेवासा/पाथर्डी/अकोले.

सदर परिपत्रकाच्या प्रत आपणास ईमेल तसेच टपालाने प्रती पाठविण्यात येत असून त्यापैकी एक प्रत आगार सुचनाफलकावर लावण्यात यावी व एक प्रत बसस्थानक सुचनाफलकावर लावावी, व एका प्रतीवर तसे केल्याबाबत साक्षीदाराची सही घेवून उलट टपाली या कार्यालयास पाठविण्यात यावी. सहीची प्रत पाठविण्यासाठी स्मरणपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच आपले शाखा/आगार येथे काम करणा-या कर्मचा-यांच्या मुलांचे अर्ज दि.०५.०१.२०२३ पुर्वी या कार्यालयास पाठवावेत. तसेच कर्मचा-यांच्या मुलाचे अर्जासोबत त्यांचे वडील आपले शाखा/आगार येथे काम करीत असल्याचे प्रमाणपत्र देखील देण्यात यावे व संबंधित रा.प.कर्मचा-यांचे लेखी निवेदनही अ.क्र.२ प्रमाणे अर्जासोबत पाठवावे. [उमेदवारांसाठीच्या सूचना काळीपूर्वक वाचाव्यात.]

सोबत - वरीलप्रमाणे

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन अहमदनगर